नि.फौ.ख.क्र. १९४/२०२३

सरकार –वि– राहुल चौधरी व इतर

नि.क्र. ३१५

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्व क निवेदन करतो की:–

माझे नाव – प्रसेनजीत रंगनाथ इंगळे,

वय. ३७ वर्षे, व्यवसाय – लिपीक,

राहणार – बुलडाणा, ता. जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

०१. दि. २८.०६.२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार माझ्या वरिष्ठांनी पंच म्हणून आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा येथे हजर राहण्यास मला सांगण्यात आले होते. आता मला माझ्या वरिष्ठांनी मला दिले ले पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझ्या वरिष्ठांची सही आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३१६** देण्यात येते. त्यानुसार मी दि. ३०.०६.२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा येथे हजर होतो. त्यावेळेस आरोपी राहुल चौधरी यांनी माझ्या समक्ष आर्थिक गुन्हे शाखा येथे बयाण दिले होते. राहुल चौधरी यांनी माझ्या समक्ष सांगितले की, सोन्याचे दागीणे मी माझी आकडसासु हिच्या घरी बामनोद येथे ठे वले ले आहेत व मी ते काढू न देतो. आता मला आरोपीने माझ्या समक्ष दिलेले निवेदन दाखविण्यात आले. त्यावर माझी, महेश प्रेमकिशोर श्रीवास व तपासी अधिकारी, व आरोपी राहुल चौधरी यांची सही आहे. त्यानुसार मी पोलीसांसोबत यावल तालुक्यातील फैजपुर पोलीस स्टेशन येथे गेलो. तेथून आम्ही बामनोद गावी चौधरीच्या घरी गेलो. तेथे गेल्यावर माझ्या समक्ष पोलीसांनी चौकशी करुन घराची झडती घेतली असता त्यांना जप्ती पत्रकामध्ये नमुद असले ले दागीणे मिळून आले. त्यानंतर पोलीसांनी स्थानीक सोनाराला बोलावून दागीण्याचे वजन केले. ते दागीणे माझ्या समक्ष जप्त केले. ज्याठिकाणी आम्ही गेलो होतो ते घर जावळे यांच्या मालकीचे होते. आता मला मेमोरंडम पंचनाम्यातील मजकूर वाचून दाखविला असता तो बरोबर आहे . त्यावर माझी सही, दुसरा पंच महेश श्रीवास, तपास अधिकारी व राहुल चौधरी यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३१७** देण्यात येते. आता मला एक सोन्याची पोथ, दोन सोन्याची चैन, कानचैन, अंगठी, एक बेसर, चांदीच्या चैनपट्ट्या, एक सोन्याची रुद्राक्ष

कडीदाखविण्यात आली. त्या त्याच आहेत. सोन्याच्या पोथला **वस्तुचिन्ह–अ**, दोन सोन्याच्या चैनीला **वस्तुचिन्ह–ब**, सोन्याची कानचैनला **वस्तुचिन्ह–क**, सोन्याची अंगठी व बेसरला **वस्तुचिन्ह–ड व इ**, व सोन्याच्या रुद्राक्ष कडीला **वस्तुचिन्ह–फ** देण्यात येते. चांदीच्या चैनपट्टीला वस्तुचिन्ह–ग देण्यात येते.

०२. दि.३०.०६.२०२३ रोजी आरोपीकडू न तीन मोबाईल जप्त करण्यात आले. त्यानुसार जप्ती पंचनामा माझ्या समक्ष करण्यात आला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र.१ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३१८** देण्यात येते. आता मला एक काळ्या रंगाचा मिडनाईट आयफोन दाखविण्यात आला. त्याचा आय.एम.ई.आय नं. ३५३३४६५४०२५२५३३ असा आहे. तो तोच आहे. त्याला **वस्तुचिन्ह–अ १** देण्यात येते. आता मला सॅमसंग गॅलेक्सीचा मोबाईल फोन दाखविण्यात आला. तो काळ्या रंगाचा होता. तो तोच आहे. त्याचा आय.एम.ई.आय नं. ३५०९७३४२५५८११९० असा आहे. त्याला **वस्तुचिन्ह–अ २** देण्यात येते. आता मला गॅलेक्सी ए १४ चा मोबाईल फोन दाखविण्यात आला. त्याचा आय.एम.ई.आय नं.३५००३१४७४३८७०१३ असा आहे. त्याला वस्तुचिन्ह–अ ३ देण्यात येत आहे. आता मला दुसरा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र.१ म्हणून माझी सही, तपासी अधिकारी व राहुल चौधरी यांची सही आहे .त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३१९** देण्यात येते. दि. ३०.०६.२०२३ रोजी माझ्या समक्ष काळ्या रंगाची बोले रो गाडी आरोपी राहुल चौधरी यांच्याकडू न जप्त करण्यात आली होती. त्याचा जप्ती पंचनामा करण्यात आला. आता जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, तपासी अधिकारी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३२०** देण्यात येते. बोले रो गाडी मी बघितली तर ओळखु शकतो. त्याच दिवशी बोले रो पिकअप गाडी जप्ती पंचनामा तयार करुन माझ्या समक्ष जप्त करण्यात आली. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, तपासी अधिकारी व आरोपी राहुल चौधरी यांची सही आहे . त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३२१** देण्यात येते. दोन्ही चारचाकी वाहन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर असले ल्या निकी हॉटेल, भुसावळ येथून जप्त करण्यात आल्या. मिडनाईट आयफोन बामनोद येथून आरोपी राहुल चौधरी यांच्या घरुन जप्त करण्यात आला होता. बामनोद येथील घर जावळे यांच्या मालकीचे होते. उर्वरित दोन मोबाईल फोन स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा यांच्या कार्यालयात जप्त करण्यात आले. आरोपी राहुल चौधरी याला मी

ओळखु शकतो.आरोपी राहुल चौधरी आज न्यायालयात हजर नाही. राहुल चौधरी हा न्यायबंदीस्त असल्यामुळे तुरुंगात आहे व त्याला तुरुंगातून न्यायालयात हजर केले नाही. जावळे यांना मी ओळखु शकतो. आज जावळे न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ व ५ तर्फे श्रीमती व्ही. व्ही. कुमकुले, वकील यांचे मार्फत.</u>**

०३. हे म्हणणे खरे नाही की, निवेदन पंचनाम्यातील लिखापडी आधीच पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. निवेदन पंचनामा मी वाचला होता व निवेदन पंचनाम्यातीलमजकूर आरोपीला सुध्दा वाचून दाखविण्यात आले होते . मी जावळे यांच्या घरी गेलो होतो. त्यावेळेस जावळें च्या घरी आरोपीची पत्नी व आरोपीचा मुलगा हजर होता. घरी जावळे बाई सुध्दा हजर होत्या. दि. ३०.०६.२०२३ रोजी चेतना जावळे यांची तारीख असल्यामुळे त्या न्यायालयात हजर होत्या, हे म्हणणे खरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, जावळे बाई घरी असल्यामुळे मी त्यांना ओळखु शकतो हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जावळे यांच्या घरी सोन जप्त करायला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पोलीस स्टेशनमध्येच पंचनामा करुन मी त्यावर सह्या केल्या होत्या. पोलीसांनी आरोपी राहुल चौधरी याला सोन्याच्या पावत्या मागितल्या होत्या. मी त्या पावत्या बघितल्या होत्या. त्या पावत्या आरोपी राहुल चौधरी यांच्या नावाने होत्या. पोलीसांनी त्या पावत्या माझ्या समक्ष जप्त केल्या होत्या. या प्रकरणाच्या अभिले खात त्या पावत्या समाविष्ट केल्या आहेत की काय हे मी सांगु शकत नाही. जप्त केले ले सोने कोणत्या तारखेला खरेदी केले होते हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पावत्या व सोने माझ्या समक्ष जप्त न केल्यामुळे सोने कोणत्या तारखेला खरेदी केले हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेले सोने पुनम राहुल चौधरी हिच्या नावाने होते व गुन्हा घडण्याच्या पूर्वी सोने खरेदी करण्यात आले होते. पंचनामा निश्चित किती वाजता केला हे मला सांगता येणार नाही परंतु पंचनामा अंदाजे ०२.०० वाजता करण्यात आला. जप्त केले ल्या तीन मोबाईल कोणाच्या नावाने होते हे मला सांगता येणार नाही व तीन मोबाईलच्या पावत्या मी बघितल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, सर्व पंचनामे एकाच वेळेस झाले होते. दपु ारी ०२.३० वाजता मोबाईल जप्त करण्यात आले व गाडी अंदाजे ०३.३० वाजता जप्त करण्यात आली. जप्त केले ल्या वाहनांचा नोंदणीकृत क्रमांक, इंजीन नंबर व चेसिस नंबर मला सांगता येणार नाही. जप्त केलेले वाहनापैकी एक वाहन चेकेटकर यांच्या नावाने व दुस रे वाहन कोणाच्या

नावाने होते हे मलासांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे माझ्या समक्ष कोणत्याही पंचनामा न झाल्याने मला वाहनाची पूर्ण माहिती सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे श्री. ए. पी. इखारे, वकील यांनी नाकारला.**

**उलटतपास आरोपी क्र. २ चे विधीज्ञ श्री. जी. एच. इंगळे गैरहजर व आरोपी क्र. ६ चे विधीज्ञ श्री. जी. व्ही. पिसे गैरहजर त्यामुळे त्यांच्याकडू न साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०६.१०.२०२५ | दि.०६.१०.२०२५ |